परीक्षा प्राधान्य
महत्वाचे

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१७/४५२७
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- २/०८/२०१७

प्रति,
केंद्र संचालक (सर्व)
शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा
ऑगस्ट-२०१७

विषय :- जीसीसी परीक्षा ऑगस्ट-२०१७ प्रवेशपत्रासोबत अन्य फोटो ओळखपत्र अनिवार्य असलेबाबत.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, जीसीसी परीक्षा ऑगस्ट-२०१७ सोमवार दि.०७ ऑगस्ट ते शनिवार दि.१२ ऑगस्ट २०१७ या कालावधीत होत आहे. (दि.०९ ऑगस्ट २०१७ रोजी परीक्षा नाही.) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावरील फोटोंची पडताळणी अन्य फोटो ओळखपत्रावरुन करून परीक्षा कक्षात परीक्षार्थ्यांना प्रवेश दयावा. यासाठी मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड, बँक पासबुक, शाळा महाविद्यालयाचे ओळखपत्र इत्यादी पैकी कोणत्याही एकाची मागणी परीक्षार्थ्यांकडे करावी.

अपंग विद्यार्थ्यांच्याबाबत देण्यात आलेले मदतनिस/सनेत्रवाचक यांचे फोटो ओळखपत्र तपासूनच संबंधितांना परीक्षा देण्यास परवानगी द्यावी. प्रवेशपत्रावरील सूचना क्र.१ मध्ये ही बाब सविस्तरपणे नमूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र व अन्य फोटो ओळखपत्र परिषदेस पाठविण्याची आवश्यकता नाही.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे

प्रत:-

१. शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद सर्व
२. शिक्षणनिरीक्षक बृहन्मुंबई (उ/द/प) मुंबई
३. संस्थाचालक/प्राचार्य,
   शासनमान्य टंकलेखन संस्था सर्व

AUG-17/LETTER